**सं.फौ.ख.क्र. ३८८५/२०२४**

**नितीन –वि.– अतुल**

**नि. क्र.०५ वर**

**आरोपीतर्फे विधिज्ञ मोहम्मद खालीक यांच्या मार्फत तक्रारदार यांच्या साक्षीदार क्र. ०१ यांची उलटतपासणी शपथेवर खालील प्रमाणे सुरू**

**०१.** हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला सन २०१५ पासुन मी चांगल्या प्रकारे ओळखतो. मला माहिती नाही की, आरोपी हा आदिवासी समजाचा आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, मी आदिवासी, एस.सी. एस.टी. समाजाचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ मध्ये मी ठेकेदारीचे काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०१५ पासुन आकाश नेवारे, आशिष चव्हाण, मंगेश वागणे व बबलु रिठे यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ मध्ये मी ठेकेदारीचे काम करीत होतो व आरोपी हा माझ्याकडे इलेक्ट्रीकचे काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्याकडे पगाराचे पैसे ठेवत असत. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१९ पर्यंत आरोपीने माझ्याकडे काम केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा पगार कमीत कमी एक लाख रुपये माझ्याकडे जमा होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० मध्ये लॉक डाऊन लागला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला त्याचे पैसे मागितले व मी त्याला दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सप्टेंबर २०२४ पर्यंत मी आरोपीला पैसे परत देईल असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०८/०८/२०२४ रोजी आरोपीचे चेक बुक हरविले होते व त्यातील धनादेश हा प्रसतुत प्रकरणात त्यांनी दाखल केला. मला माहिती नाही की, आरोपीने सदर चेक बुक हरविल्याबाबत पोलीसांत तक्रार दिली किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, बँकेला त्यांनी पेमेंट स्टॉप करण्याचे सुचना दिल्या होत्या.

**०२.** सन २०१२ ते २०१३ पासुन मी जमीनी खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो. मला महिती आहे की, आदिवासी लोकांची जमीन हे परवानगीशिवाय विकता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मालमत्ता विकत घेतांना आपण त्यांची पुर्ण

माहिती काढुन विकत घेतो.

**०३.** मी अभिलेखावर आरोपीच्या वडीलांचे एकटयाचे घर आहे याबाबतचे दस्त दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गाडगे नगर येथे आरोपीच्या वडीलांचे घर नाही. अभिलेखावर मी आरोपीच्या वडीलांचे घर आहे व त्यामध्ये आईचा हिस्सा व भावाचा हिस्सा आहे हे दाखविण्यासाठी मी अभिलेखावर दस्त दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, असा कुठलेही घर नसल्यामुळे मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे वडीलांचे कोणतेही घर नसल्यामुळे माझ्यासोबत कुठलाही विक्रीचा करार झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, करारनामा करतेवेळेस साक्षीदारांचे पुर्ण नाव व पत्ता लिहिला जातो. आता मला निशाणी क्र.२४ दाखविण्यात आला. त्यामध्ये साक्षीदारांचा पत्ता नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.२४ बनावट करुन दाखल केला.

**०४.** धनादेशाद्वारे रक्कम रुपये ५०,०००/- दिनांक १३/०२/२०१९ रोजी दिले, तसेच दिनांक १३/०२/२०१९ रोजी धनादेशाद्वारे रक्कम रुपये २०,०००/- व दिनांक १९/०३/२०१९ रोजी रक्कम रुपये १०,०००/- धनादेशाद्वारे दिले, हे दाखविण्यासाठी अभिलेखावर दस्त दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, पैशाची देवान घेवान करतांना पावतीमध्ये देणार घेणार यांचे पुर्ण नाव व पत्ता नमुद असतो. आता मला **निशाणी क्र.२५** दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या पावतीवर पैसे देणार व घेणार यांचे नाव व पत्ता नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची पावती मी खोटी बनवुन दाखल केली.

**०५.** मी आरोपीच्या विरोधामध्ये कोणताही दिवाणी दावा दाखल केला नाही. मी आरोपीच्या विरोधामध्ये पोलीस तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.२४,२५,२६ हे बनावट तयार करुन मी दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कधीही धनादेश दिला नाही व त्याचा हरविलेला धनादेश मी घेवुन बनावट केस दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत रद्द केलेल्या कराराची कॉपी अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत

कुठलाही करार झाला नाही, म्हणुन अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे पैसे मला दयायचे नव्हते म्हणुन खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, **निशाणी क्र.२६** नुसार आरोपीने परतफेडकरीता कोणताही धनादेश मला दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी नोटीस पाठविली व खोटी केस केली.

**उलटतपासणी संपली**
**फेरतपास काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DHONDGE PADMAKAR KASHINATHRAO
Date: 2026.08.13 17:10:29 +0530

अमरावती.
दिनांक : १३.०८.२०२६

(डॉ. पद्माकर धोंडगे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.०५), अमरावती.